## पोलीस अधीक्षक,कार्यालय, उस्मानाबाद.

" प्रेस नोट "

वार :- बुधवार
दिनांक :- ०७/११/२०१८

---

### " मौजे येडशी येथे दोन गटात बैलाचे खोंडाचे कारणावरुन गुन्हा "

पोलीस ठाणे उस्मानाबाद (ग्रामीण ) :- दिनांक ०५/११/२०१८ रोजी मौजे येडशी येथे फिर्यादी व साक्षीदार यांनी येडशी येथील तीन इसमांना आमचा पुतण्या चंदु इटकर यांचेशी बैलाच्या खोंडावरुन वाद का घातलास म्हणुन विचारणा करत असताना येडशी येथील १) राजा शेख २) दिलशाद शेख व इतर दोन अनोळखी मुले यांनी फिर्यादी व साक्षीदारास लोखंडी रॉडने मारुन जखमी केले व फिर्यादीचे डोक्यात रॉड मारुन जखमी केले वरुन फिर्यादी नामे मंगल बापु ईटकर रा.येडशी यांनी दि.०६/११/२०१८ रोजी पो.स्टे. उस्मानाबाद (ग्रामीण) येथे वरील चार इसमा विरुध्द कलम ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद असुन तपास पोलीस उप निरीक्षक, श्री.खांडेकर हे करत आहेत.

### " मौजे येडशी येथे दोन गटात जागेच्या कारणावरुन गुन्हा "

पोलीस ठाणे उस्मानाबाद (ग्रामीण ) :- दिनांक ०५/११/२०१८ रोजी मौजे येडशी येथे फिर्यादी नामे रज्जाक मगबुल कोतवाल हे त्यांचे पत्नी मुलाबाळासह घरी बसले असता येडशी येथील भिमा शिंदे, राजु शिंदे, तुकाराम शिंदे, चंदु इटकर, उच्चन इटकर, कविता शिंदे , सत्यभामा इटकर, लक्ष्मण देवकर, वैशीली मुद्दे, सखुबाई शिदे तुकाराम शिंदे, लहु गुंजाळ, निलेश शिंदे, सचिन शिंदे, बाबु इटकर,भगवान इटकर, अविनाश मरगु इटकर, हरी इटकर सर्व रा. येडशी यांनी फिर्यादीस जागेचे कारणावरुन फिर्यादीचे घरात जावुन गैर कायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ करुन लाथाबुक्कयांनी मारहाण करुन काठीने व दगडाने फिर्यादीस व त्यांचे पत्नीस, मुलास मारहाण करुन गंभीर जखमी करुन फिर्यादीच्या पत्नीचा उजवा हात फ्रॅकचर केला व जिवे मारण्याची धमकी दिले वरुन पो.स्टे. उस्मानाबाद ग्रामीण येथे कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३२५, ३२६,३२७,३२३,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे वरील लोका विरुध्द गुन्हा नोंद असुन तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. पाटील हे करत आहेत.

Scanned by CamScanner

**" उस्मानाबाद येथे चंदन चोरा विरुध्द गुन्हा "**

पोलीस ठाणे उस्मानाबाद (शहर) :- दिनांक ०५/११/२०१८ रोजी बालाजी नगर उस्मानाबाद येथे उस्मानाबाद शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी चंदनाची वाहतुक करणारे इसम १) अनिकेत शिवाजी सुरवसे रा. सावरगांव ता.बार्शी २) लखन सौदागर डोईफोडे. रा.नारी ता.बार्शी ३) दत्तात्रय हरीचंद्र भुसारे रा. मालेगांव ता.बार्शी ४) राहुल शिवाजी घोडके रा.मालेगांव ता.बार्शी ५) नानासाहेब कृष्णानाथ घोडके रा.मालेगांव ता. बार्शी असे इंडीका कार क्र.एम.एच-१३-ए-झेड-२१६४ मध्ये चंदनाचे लाकडे, वजन काटे व चंदनाचे लाकुड तोडण्याचे अवजारे व मोटार सायकल असे साहित्यासह अवैध विक्री करण्या करीता वाहतुक करीत असताना बालाजी नगर उस्मानाबाद येथे मिळुन आल्याने त्यांचे ताब्यात एकुण साहित्यासह किंमत अंदाजे ४,७२,७५० /- रु चा माल मिळुन आले वरुन पो. स्टे. उस्मानाबाद शहर येथे वरील लोका विरुध्द कलम ३७९,३४ भा.द.विसह कलम ४१,४२ (१), ४२ (२) भारतीय वन अधिनियमा प्रामाणे गुन्हा दाखल असुन तपास पोलीस उप निरीक्षक, श्री. शेख हे करीत आहेत.

**" मौजे शिरगापूर ता. तुळजापूर येथे घरफोडी "**

पोलीस ठाणे नळदुर्ग :- दिनांक ०५/११/२०१८ रोजीचे २२.०० दि.०६/११/२०१८ रोजीचे ०२.०० वा.दरम्यान मौजे शिरगापूर येथील फिर्यादी नामे राजेंद्र रामचंद्र सुड रा. शिरगापूर ता.तुळजापूर हे आपले कुटुंबासह घरात झापले असता कोणीतरी आज्ञात चोरटयांनी घराचे पाठीमागील खिडकी तोडुन आत प्रवेश करुन साडया, कपडे ड्रेस मटेरियल, ब्लाऊज पिस असा एकुण १४,२२७ /- रुपायाचा माल कोणीतरी आज्ञात चोरटयांनी चोरुन घेवुन गेले वरुन पो.स्टे. नळदुर्ग येथे कलम ४५७,३८० भा.द.वि प्रमाणे आज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा दाखल असुन तपास पोना/ वाघमोडे हे करत आहेत.

**" उमरगा येथे मोटार सायकल चोरी "**

पोलीस ठाणे उमरगा :- दिनांक ०५/११/२०१८ रोजीचे २२.०० वाजण्याचे सुमारास अत्तार हाजी बाब अब्दुलरशिद रा. हमीद नगर उमरगा यांनी त्यांची हिरो होंडा स्पेलंडर कंपनीची मोटार सायकल क्र.एम-एच-२५-ए-ए- ५८९९ जुनी वापरती ३०,०००/रु किंमतीची बाबा पेट्रोल पंप उमरगा येथे लावलेली कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेहली वरुन पो.स्टे. उमरगा येथे कलम ३७९ भा.द.वि प्रमाणे आज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ अडसुळ हे करत आहेत.

Scanned by CamScanner

**" सास्तुर येथे दारु अड्डयावर छापा "**

पोलीस ठाणे लोहारा :- दिनांक ०६/११/२०१८ रोजी २१.२० वाजता लोहारा पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मौजे सास्तुर येथील इसमा नामे सोपान युवराज चिमकुले रा. सास्तुर उमरगा जाणारे रोड लगतच्या पत्र्याचे शेडमध्ये छापा टाकुन ४२ देशी दारुच्या बाटल्या किंमत २,१८४ /- रुपयाचा माल जप्त करण्यात आला असुन इसमनामे सोपान युवराज चिमुकले रा. सास्तुर यांचे विरुध्द पो.स्टे. लोहारा येथे कलम ६५ (ई) मुंबई दारुबंदी कायदया प्रमाणे गुन्हा नोंद असुन तपास सपोफौ आदटराव हे करत आहेत.

पोलीस निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी,
उस्मानाबाद.

**टिप :- वर नमुद दाखल गुन्हयांचे अनुषंगाने ज्या नागरिकांना त्यांचेकडे तपासास उपयुक्त अशी माहिती असेल त्यांनी संबंधीत पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना सदरची माहिती पुरवुन तपासकामी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.**

Scanned by CamScanner